महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

## जाहिरात क्र. ०५/२०१४ अन्वये ई.एस.बी.सी. प्रवर्गामधून विद्युत सहाय्यक पदी निवड झालेल्या उमेदवारांची परिमंडळनिहाय यादी व कागदपत्रे तपासणी

१) महावितरणमध्ये **"विद्युत सहाय्यक"** या संवर्गाची रिक्त पदे भरण्याकरिता तीन वर्षाच्या निश्चित कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने उमेदवारांची निवड करण्याकरिता जाहिरात क्र. ०५/२०१४ ही माहे ऑगस्ट २०१४ मध्ये दिलेली होती. जाहिरातीस अनुसरुन ऑनलाईन अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख ३०/०९/२०१४ अशी होती.

२) उमेदवारांची निवड ही एस.एस.सी. परीक्षेतील "एकूण सरासरी गुणांच्या आधारे" करण्यात आलेली आहे. याकरिता उमेदवाराने ऑनलाईन अर्जामध्ये दर्शविलेल्या एस.एस.सी. परीक्षेमधील गुणांची टक्केवारीच ग्राह्य धरण्यात आली आहे. मा. मुंबई उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठाच्या निर्णयाच्या अनुषंगाने कंपनीने ही भरती प्रक्रिया "एकूण सरासरी गुणांच्या आधारे" करण्याचा निर्णय घेतला व उमेदवारांना तसा बदल करण्यासाठी कंपनीने दिनांक २५/१०/२०१४ पासून दिनांक ०२/११/२०१४ पर्यंत कंपनीने संकेतस्थळ उपलब्ध करुन दिले होते.

३) उमेदवारांनी ऑनलाईन अर्जामध्ये नमूद केलेल्या बाबी/विवरणेच भरती प्रक्रियेसाठी ग्राह्य धरण्यात आल्या आहेत.

४) निवड झालेल्या उमेदवारांना नेमणुकीकरिता हक्क म्हणून सांगता येणार नाही. उमेदवाराची निवड ही जाहिरातीमध्ये नमूद करण्यात आलेल्या शैक्षणिक अर्हता, अटी व शर्तीच्या अधीन राहून केवळ तीन वर्षाच्या निश्चित कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीवर आहे.

५) निवडसूची ही औद्योगिक कामगार न्यायालय याचिका क्रमांक ४८/२०१२ व मा. उच्च न्यायालय, मुंबई, नागपूर खंडपीठामध्ये याचिका क्र. ५४२/२०१८ च्या आदेशाच्या / निर्णयाच्या अधीन राहून घोषित करण्यात येत आहे.

६) शासन निर्णय दिनांक ०५/१२/२०१८ च्या अनुषंगाने मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेल्या विशेष अनुमती याचिका क्र. १५७०१/२०१९ च्या निर्णयाच्या अधीन राहून भरती प्रक्रिया राबविण्यात येत आहे.

७) शासन निर्णय दिनांक ०४/०७/२०१९ व दिनांक ११/०७/२०१९ मध्ये नमूद केलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने ईएसबीसी प्रवर्गातील निवड झालेल्या उमेदवारांना एसईबीसी प्रवर्गातून निवड करण्यात येत आहे.

८) निवड झालेल्या उमेदवारांनी सोबत दिलेल्या URL लिंकवरुन त्यांनी स्वतःचा रजिस्ट्रेशन नंबर, पासवर्ड (जन्मतारीख पासवर्ड म्हणुन वापरणे) च्या आधारे नमुद केलेली कागदपत्रे अपलोड करणे आवश्यक आहे. सदर लिंक कंपनीच्या संकेतस्थळावर दिनांक १९.१०.२०१९ पासुन दिनांक ०३.११.२०१९ पर्यंत उपलब्ध राहील. याबाबत सदर बाब वर्तमानपत्रामध्ये दिनांक २४/१०/२०१९ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती. तसेच सदर उमेदवारांना त्यांच्या ऑनलाईन अर्जामध्ये नमूद केलेल्या ई-मेल आयडीवर कळविण्यात आले आहे.

९) दिनांक १७.०९.२०१९ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेल्या निवड यादी मधील जे उमेदवार तदर्थ (Adhoc) स्वरुपात महाविरतणमध्ये सद्यस्थितीत विद्युत सहाय्यक पदावर कार्यरत आहेत अशा उमेदवारांनी कागदपत्रे अपलोड करण्याची आवश्यकता नाही. त्याचप्रमाणे कागदपत्रे पडताळणीकरीता दिनांक ११.११.२०१९ रोजी उपस्थित राहण्याची आवश्यकता नाही. यांबाबत सविस्तर सुचना संबंधीत परिमंडळ कार्यालयास देण्यात येतील.

१०) **निवड झालेल्या उमेदवारांचे दस्ताऐवज / कागदपत्रे छानणी केल्यानंतर जे उमेदवार पात्र होतील अशा उमेदवारांना तीन वर्षाच्या निश्चित कालावधीकरिता कंत्राटी पध्दतीवर "विद्युत सहाय्यक" म्हणून नेमणूक देण्यात येईल.**

११) निवड झालेल्या उमेदवारांनी शासन निर्णय दिनांक ०७/१२/२०१८ च्या अनुषंगाने विहित केलेल्या जातीच्या दाखल्याबरोबर जात पडताळणी समितीने **वैध ठरविलेले "जात वैधता प्रमाणपत्र"** सादर करणे आवश्यक आहे. तथापि, ज्या उमेदवारांकडे जात वैधता प्रमाणपत्र नसेल अशा उमेदवारांनी खाली नमूद केलेल्या यादीनुसार कागदपत्रे / दस्ताऐवज कागदपत्रे पडताळणी दिवशी सादर करावे.

१२) **निवड झालेल्या उमेदवारांनी त्यांच्या ऑनलाईन अर्जामध्ये नोंदी / अर्हता संबंधिताच्या प्रमाणपत्रांची छानणी / पडताळणी वर्ग केलेल्या संबंधीत परिमंडळ कार्यालयामार्फत दिनांक ११/११/२०१९ रोजी सकाळी १०.०० वाजता करण्यात येईल व तदनंतर संबंधित परिमंडळामार्फत सविस्तर नेमणूक करण्यात येईल.**

१३) ऑनलाईन अर्जामध्ये नोंदविलेल्या नोंदी संबंधी दस्ताऐवज / दाखले छानणीकरिता सादर करणे ही सर्वस्वी संबंधित उमेदवाराची जबाबदारी आहे. ऑनलाईन अर्जामधील व जाहिरातीमधील अर्हतेबाबत नमूद केलेली कागदपत्रे ज्या दिवशी कागदपत्रे पडताळणी होतील त्यादिवशी सादर करु शकले नाहीत तर त्याची उमेदवारी रद्द करण्यात येईल आणि यास उमेदवार सर्वस्वी जबाबदार राहील.

१४) निवड झालेल्या उमेदवारांनी खाली दर्शविल्याप्रमाणे मूळ कागदपत्रे व स्वसाक्षांकीत केलेले छायांकीत प्रतींसहीत कागदपत्रे तपासणीसाठी संबंधित परिमंडळामध्ये कागदपत्रे पडताळणीकरीता हजर रहावे :-

क) सिस्टीम जनरेटेड ॲप्लीकेशन फॉर्म (System Generated Application Form) **(ऑनलाईन अर्जाची प्रत कागदपत्र पडताळणीच्या ठिकाणी उपलब्ध करुन देण्यात येईल)**

ख) एस.एस.सी. गुणपत्रक / प्रमाणपत्र (For Date of Birth & Marathi Language)

ग) आय.टी.आय. प्रमाणपत्र (Electrician / Wireman) / सेंटर ऑफ एक्सलन्स (Electrical Sector) प्रमाणपत्र व राष्ट्रीय व्यवसाय प्रमाणपत्र इत्यादी.

घ) जातीचे प्रमाणपत्र

च) जातीचे वैधता प्रमाणपत्र (वैधता प्रमाणपत्र नसलेल्या उमेदवारांनी जाती वैधताबाबतची सोबत जोडलेल्या यादीतील नमूद केलेले कागदपत्रे सादर करावी.)

छ) शासन निर्णय दिनांक १५/०७/२०१४ अन्वये ईएसबीसी करिता देण्यात आलेले जात प्रमाणपत्रे एसईबीसी वर्गातील आरक्षणाकरिता ग्राह्य धरण्यात येतील.

ज) समांतर आरक्षणाच्या पृष्टयर्थ सक्षम प्राधिकाऱ्याकडून विहित केलेले प्रमाणपत्र.

झ) प्राविण्यप्राप्त खेळाडू व्यक्तींसाठी असलेल्या आरक्षणाचा दावा करणाऱ्या उमेदवारांच्या बाबतीत शासन निर्णय दिनांक १८/०८/२०१६ अन्वये क्रीडा विषयक विहित अर्हता धारण करीत असलेबाबत सक्षम प्राधिकाऱ्याने खेळाचे प्राविण्य प्रमाणपत्र कागदपत्रे पडताळणी दिवशी सादर करणे अनिवार्य आहे. अन्यथा सदर उमेदवाराची उमेदवारी रद्द करण्यात येईल.

ट) अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate)

ठ) उन्नत / प्रगत गटाचे नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र

*****